


## जोड पत्र अ

## (पहा नियम ६ (१))

## महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ अन्वये अर्जाचा

प्रति,

मा. जन माहिती अधिकारी
कार्यकारी संचालक, पावर ग्रेड कार्पोरेशन ऑफ इंडिया
नारानारी रिंग रोड, संप्रतीनगर, नागपुर.

१) अर्जदाराचे नांव :- अनिल संपत शेरे मु.पो. बोराखेडी बा.

२) पत्ता :- ता. देऊळगाव राजा जि. बुलढाणा।
9511942438

३) --------------------------------

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपक्षिल :- पॉवर ग्रेड कार्पोरेशन ऑफ इंडिया संबधीत

(एक ) माहितीचा विषय :- पॉवर ग्रेड कार्पोरेशन उच्च/अतिउच्च वाहिनीच्या तारेखालील शेतकऱ्यांना मिळालेला जमिनीच्या मुआवजा।

( दोन ) माहिती सबंधीत कालावधी :- सात दिवसाच्या आत

(तीन )आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :- गडचिरोली जिल्ह्यातील व उपविभागाअंतर्गत पावर ग्रेड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या उच्च/अतिउच्च दाबाच्या वाहिनीसाठी जमिनीच्या किती मोबदला मिळाला त्यांच्या मूल्यांकनाकाची प्रत व तारेखालील जमिनीसाठी किती मोबदला वाटप करण्यात आला याची सविस्तर माहिती शासन निर्णयाच्या प्रमाणित प्रति सह देण्यात यावे.

(चार)माहिती दपालद्वारे किंवा व्यक्तिश :- व्यक्तिश

(पाच)टपालद्वारे असेल तर त्या बाबतीत :- टपालद्वारे

सर्वसाधरण, नोंदणीकृत किंवा शीघ्र ) :- शीघ्र

(सहा)ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन :- न्यायालीन कामासाठी

दिनांक :-

अर्जदाराची सही / अंगठा

अनिल संपत शेरे
9511942438

श्रीमती दिव्या
अधीक्षक अभियंता
(signature) 14/11/2019

### कोरचीलगतची घटना : तीन तासांच्या प्रयत्नानंतर खाली उतरविण्यात यश

# पॉवर ग्रीडच्या टॉवरवर चढलेल्या महिलेने उडविली सर्वांची भंबेरी!

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोरची (गडचिरोली) :** एखाद्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी मोबाईलच्या टॉवरवर किंवा पाण्याच्या टाकीवर चढून विरुगिरी करण्याच्या घटना अनेक वेळा घडत असतात. परंतू कोणतेही कारण नसताना एका महिलेने चक्क उच्च दाबाचा वीज पुरवठा करणाऱ्या पॉवर ग्रीडच्या उंच टॉवरवर चढून सगळ्यांचीच भंबेरी उडवून दिली. अखेर मोठ्या प्रयासानंतर तिला खाली उतरविण्यात गावातील युवकांना यश आले.

ही घटना कोरचीपासून २ कि.मी. अंतरावर असलेल्या नवरगाव येथे बुधवारी सकाळी घडली. रामकली रुपेंद्र जमकातन (२४ वर्षे) असे त्या महिलेचे नाव आहे. कोरची येथील रहिवासी असलेली ही महिला सकाळी ८ वाजताच्या सुमारास वरोरा ते रायपूर अशा जाणाऱ्या पॉवरग्रीडच्या टॉवरवर चढल्याचे गावातील महिलांच्या लक्षात आले. त्यांनी ताबडतोब आरडाओरडा सुरु केली. दरम्यान लोकमतचे प्रतिनिधी खासगी कामासाठी त्या भागात गेले असताना त्यांना ही गडबड दिसून आली. त्यांनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून पोलीस व प्रशासनाशी संपर्क साधला.

काही वेळातच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसह तहसीलदार, अन्य कर्मचारी वर्ग आणि गावकरी तिथे जमले. तिला सर्वजण खाली उतरण्याचे आवाहन करु लागले. पण ती खाली येण्याऐवजी टॉवरच्या उंचावरील भागाकडे जाऊन दोन्ही हातांनी वरच्या खांबाला पकडून झुलत होती.

हे दृष्य पाहून ती खाली उभ्या लोकांची धडधड वाढली. ऊन वाढत असताना अखेर तिच्या पतीने खाली उतरण्याची विनंती केली. तेव्हा कुठे ती खाली येऊ लागली. पण टॉवरच्या मध्यभागी पोहचल्यानंतर तिला खालीही उतरता येत नव्हते.

ती चुकून खाली पडली तर वाचणार नाही म्हणून गावकऱ्यांनी एक मोठी हिरवी मॅट आणून टॉवरखाली मॅट हाती घेऊन उभे झाले. दरम्यान गावातील काही बहाद्दर युवकांनी तापत्या उन्हात टॉवरवर चढून तिला गाठले आणि हळूहळू खाली उतरविले. यानंतर सर्वांनीच सुटकेचा नि:श्वास टाकला.

या संपूर्ण घडामोडीला तब्बल तीन तास लागले. रामकलीला दोन वर्षांचा मुलगा आहे. काही दिवसांपासून ती वेडसरपणे वागत असल्याचे तिच्या घरच्यांनी सांगितले. तिला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. तेथून तिला मनोरुग्णालयात नेणार असल्याचे सांगण्यात आले.



टॉवरवर लाल वर्तुळापर्यंत गेलेली महिला, तसेच तिला खाली उतरविताना युवक.

प्रति,

कार्यकारी संचालक, पावर ग्रेड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया,
नारानारी रिंग रोड, संप्रती नगर
नागपुर

15

केंद्रीय प्रेषण
WMSS
13 NOV 2019
पावरग्रिड, नागपुर

EMS SPEED POST
EM262259966IN

मि. बुलढाणा
Mo. 9511942438